ePaper

पुतीन यांनी उद्योजकांकडे मागितला पैसा, 'चेक' लिहायला घेण्यास सांगितले



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 28 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 2 वरुन...

वरंधा घाटात वाहतुकीला ब्रेक; सव्वा महिन्यासाठी रस्ता बंद

## आठ लाख टन एलपीजी उपलब्ध, पेट्रोल-डिझेलचा पुरवठा सुरळीत; घबराटीत खरेदी करू नये

# देशात ६० दिवसांचा इंधनसाठा; टंचाईच्या अफवांपासून दूर राहा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**देशाकडे ६० दिवस पुरेल इतका तेलसाठा असून एक महिन्याच्या एलपीजी पुरवठ्याची पूर्ण व्यवस्था करण्यात आली आहे, असे केंद्र सरकारने गुरुवारी स्पष्ट केले. पेट्रोल, डिझेल किंवा एलपीजीचा कोणताही तुटवडा नसून, घबराट निर्माण करून इंधन खरेदी करण्यास प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने हेतुपुरस्सर चालवलेली ही मोहीम असल्याने तिला बळी पडू नका, असे आवाहन सरकारने केले.**



> देशात दोन महिन्यांची गरज भागवण्यासाठी पुरेसा इंधनसाठा आहे. त्यामुळे अकारण भीती निर्माण करून अतिरिक्त इंधन खरेदी करण्यास प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने हेतुपुरस्सर चालवल्या जात असलेल्या मोहिमेला नागरिकांनी बळी पडू नये.
> - केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय



अमेरिका-इस्रायल व इराण यांच्यातील युद्धामुळे देशात सध्या इंधनटंचाई असल्याच्या चर्चेने नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी गॅस सिलिंडर आणि इंधन साठवण्यास सुरुवात केली असून पेट्रोलपंपांसमोर रांगा लागत आहेत. या पार्श्वभूमीवर पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने पश्चिम आशियातील युद्ध सुरू झाल्यापासून प्रथमच कच्च्या तेलाचा, इंधनाचा आणि एलपीजीचा साठा जाहीर केला. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ नये यासाठी हे पाऊल उचलण्यात आले.

घरगुती वापरासाठी एलपीजीची कमतरता नाही. इंधनाच्या अतिरिक्त देशांतर्गत उत्पादनामुळे, तसेच पश्चिम आशियाई नसलेल्या पुरवठादारांकडून येणाऱ्या एलपीजीच्या अतिरिक्त मालवाहू खेपांमुळे पुरवठ्याची परिस्थिती सुधारत आहे, असे सरकारने सांगितले. पश्चिम आशियाई नसलेल्या पुरवठादारांकडून आयातीद्वारे सुमारे एक महिन्याच्या एलपीजी पुरवठ्याची निश्चितपणे व्यवस्था करण्यात आली आहे. देशात आठ लाख टन एलपीजी सुरक्षित असून अतिरिक्त खरेदीची सातत्याने व्यवस्था केली जात आहे, असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले.



### लहान शहरांमध्ये अडचणी का?

तेल कंपन्यांनी काही पेट्रोल पंपांवर 'कॅश-अँड-कॅरी' पद्धत लागू केल्यामुळे, विशेषतः लहान शहरांमधील काही पेट्रोल पंपांना इंधन उचलण्यात अडचण येत आहे. त्यामुळे पंप मालकांच्या खेळत्या भांडवलाच्या समस्यांमुळे कोणत्याही पंपावर पेट्रोल आणि डिझेलची कमतरता भासू नये, यासाठी पेट्रोल पंपांना पूर्वी एका दिवसाऐवजी तीन दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी पतपुरवठा (क्रेडिट) वाढवण्यासाठी पावले उचलण्यात आली आहेत, असे मंत्रालयाने म्हटले आहे.

देशभरातील सर्व पेट्रोल पंपांवर पुरेसा साठा असून ते सामान्यपणे कार्यरत आहेत आणि पेट्रोल किंवा डिझेलचे रेशनिंग केले जात नाही. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून आयातीला अडचणी येत असल्या तरी भारताला सध्या जगभरातील ४१ हून अधिक पुरवठादारांकडून कच्चे तेल मिळत आहे. प्रत्येक भारतीय तेल शुद्धीकरण कारखाना १०० टक्क्यांपेक्षा जास्त क्षमतेने कार्यरत आहे. पुढील ६० दिवसांचा कच्च्या तेलाचा पुरवठा भारतीय तेल कंपन्यांनी आधीच निश्चित केला आहे. पुरवठ्यात कोणतीही तूट नाही, असे असे पेट्रोलियम मंत्रालयाने प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे.

दरम्यान, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (आयओसी), भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) या कंपन्यांनीही त्यांचे पेट्रोल पंप सामान्यपणे कार्यरत असून कोणत्याही इंधनाची कमतरता नाही, असे जाहीर केले.

# वरंधा घाटात वाहतुकीला ब्रेक; सव्वा महिन्यासाठी रस्ता बंद

## रुंदीकरण व काँक्रिटीकरणामुळे २५ मार्च ते ३० एप्रिलपर्यंत निर्बंध; पर्यायी मार्ग जाहीर

**महाईन्यूज । पुणे**

**राष्ट्रीय महामार्ग क्र. ९६५ डी.डी.वरील हिर्डोशी ते वरंधा (कि.मी. ७०/९०० ते ९२/००३) या दरम्यान रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रिटीकरणाचे काम सुरू असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव हा रस्ता दि. २५ मार्च २०२६ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत सुमारे सव्वा महिना वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग पुणे यांनी भोर-महाड रस्त्यावरील कामासाठी उपविभागीय अधिकारी, भोर यांच्याकडे रस्ता बंद करण्याची मागणी केली होती. त्यानुसार भोर तहसील व भोर पोलिस निरीक्षक यांच्या अहवालानंतर प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला. मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम ११५ नुसार जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित रस्ता सव्वा महिन्यासाठी बंद करण्याचे आदेश दिल्याची माहिती अधिकारी डॉ. विकास खरात यांनी दिली.

राष्ट्रीय महामार्ग क्र. ९६५ डी.डी. वरील भोर तालुक्यातील या भागात रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू आहे. हिर्डोशी ते वरंधा घाट हा दरडप्रवण भाग असून, अनेक ठिकाणी वेडीवाकडी व धोकादायक वळणे आहेत. एकूण २१.१० कि.मी. लांबीच्या कामापैकी सुमारे ३.५० कि.मी. भागात वाहतूक वळवून डीएलसीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. मात्र उर्वरित भागात एका बाजूला नीरादेवघर धरणाचे पाणी आणि दुसऱ्या बाजूला उंच डोंगर असल्याने वाहतूक वळविण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही. येणारा पावसाळा लक्षात घेऊन घाटातील उर्वरित कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.



दरम्यान, या कालावधीत पर्यायी मार्ग जाहीर करण्यात आले आहेत. पुण्याकडे जाणाऱ्या वाहनांसाठी माणगाव-निजामपूर-ताम्हिणी घाट-मुळशी-पिरंगुट-पुणे असा मार्ग सुचविण्यात आला आहे. तसेच कोल्हापूरकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा-पोलादपूर-महाबळेश्वर-वाई-सुरूर-सातारा-कराड-कोल्हापूर किंवा राजेवाडी फाटा-पोलादपूर-खेड-चिपळूण-पाटण-कराड-कोल्हापूर असे पर्यायी मार्ग देण्यात आले आहेत. महामार्ग पोलिस केंद्र सारोळा येथील पोलिस निरीक्षकांनी सांगितले की, या महामार्गाशी धामणदेव, कारुंगण, हिर्डोशी, सोमजाई माळ, टाक्या माळ, वारवंड, शिरगाव, अशिंपी, उंबर्डेवाडी, उंबर्डेगाव आणि शिळीम अशी अनेक गावे जोडलेली आहेत. त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन पूर्णपणे बंद न ठेवता आवश्यक त्या ठिकाणी पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

### पर्यायी मार्गांची माहिती

हिर्डोशी–वरंधा घाट रस्ता बंद असल्याने पुण्याकडे जाणाऱ्या वाहनांसाठी माणगाव–निजामपूर–ताम्हिणी घाट–मुळशी–पिरंगुट–पुणे हा मार्ग सुचविण्यात आला आहे. तसेच कोल्हापूरकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा–पोलादपूर–महाबळेश्वर–वाई–सातारा–कराड किंवा राजेवाडी फाटा–पोलादपूर–खेड–चिपळूण–पाटण–कराड असे पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

# सोशल मीडियातून ओळख, अत्याचारापर्यंत प्रवास; ऋषिकेश वैद्यवर गुन्हा

**महाईन्यूज । पुणे**

**नाशिक येथील भोंदू बाबा कॅप्टन अशोक खरात प्रकरण ताजे असतानाच मांजरी येथे एका भोंदू बाबाचा कारनामा उघड झाला आहे. फेसबुकवरील ओळखीतून नाते निर्माण करीत एका विवाहितेवर अत्याचार केला आहे. या भोंदूवर मांजरी बुद्रुक येथील पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऋषिकेश वैद्य (रा. वसई) असे या भोंदू बाबाचे नाव असून त्याच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

### भोंदू बाबांचा वाढता धोका!

सोशल मीडियावरून ओळख वाढवत महिलांचा विश्वास संपादन करून गुंगीचे पेय देत अत्याचार आणि ब्लॅकमेलिंग करणाऱ्या भोंदू बाबांचे प्रकार वाढत आहेत. अशा घटनांमुळे नागरिकांनी सावध राहून अनोळखी व्यक्तींवर सहज विश्वास ठेवू नये, तसेच संशयास्पद प्रकार त्वरित पोलिसांकडे कळवावेत.

येथील एका विवाहित महिलेची भोंदू बाबा ऋषिकेश वैद्य याच्याशी दोन वर्षांपूर्वी ऑक्टोबर महिन्यात फेसबुकवर ओळख झाली होती. या ओळखीचा गैरफायदा घेत संशयित ऋषिकेश वैद्य याने मी महादेवाचा भक्त असून महादेवाची उपासना कशी करायची हे शिकवतो, "मी महादेव आणि तू पार्वती" असे सांगून फिर्यादी महिलेचा विश्वास संपादन केला.

संबंधित महिलेला या गोंधणी मांजरी परिसरातील एका लॉजवर नेले. तेथे तिला गुंगी येणारे पेय देऊन शारीरिक संबंध प्रस्थापित करीत तिच्यावर अत्याचार केला. तसेच, तिची अश्लील छायाचित्रे काढून तिला ब्लॅकमेल करत पुन्हा वसईच्या हॉटेलमध्ये बोलावले. तेथेही तिच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध प्रस्थापित केले.



नाशिक येथील भोंदू बाबा कॅप्टन अशोक खरात प्रकरणानंतर हिम्मत आलेल्या या महिलेने ऋषिकेश वैद्य याच्या विरोधात माणिकपूर पोलिस स्टेशन, वसई येथे झिरो नंबरने गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर तो मांजरी पोलिस ठाण्यात वर्ग करून येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक बाबासाहेब निकम यांच्या मार्गदर्शनाखाली केला जात आहे.



### विश्वासघातातून गुन्ह्याची साखळी

भक्ती, श्रद्धा आणि धार्मिक भावनांचा गैरवापर करून महिलांना जाळ्यात ओढण्याचे प्रकार चिंताजनक आहेत. ओळखीचा फायदा घेत फसवणूक, अत्याचार आणि धमकी देण्याचे प्रकार समाजासाठी धोकादायक ठरत असून अशा भोंदू प्रवृत्तीविरुद्ध कठोर कारवाईची गरज आहे.

# नाशिकफाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या निविदा प्रक्रियेला गती

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा ठरला यशस्वी; मोठ्या कंपन्यांची स्पर्धा वाढली

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड ते राजगुरूनगर खेड दरम्यान गेल्या अनेक वर्षांपासून नागरिक, कामगार आणि उद्योजक त्रस्त असलेल्या भीषण वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी नियोजित नाशिक फाटा ते खेड या ३० किमी लांबीच्या ८ पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पाने महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. मार्च २०२६ मध्ये या प्रकल्पासाठी तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असून, या प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेला आता गती मिळाली आहे.**



> "नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर हा पिंपरी-चिंचवड, भोसरी, मोशी, चाकण आणि खेड परिसरातील लाखो नागरिक, कामगार आणि उद्योजकांसाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असून त्याच्या निविदा प्रक्रियेला मिळालेली गती समाधानकारक आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्या नेतृत्वात आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली या महत्वाकांक्षी प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत आम्ही सर्वतोपरी पाठपुरावा करणार आहोत." - **महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) मार्फत राबवण्यात येत असून, यासाठी सुमारे ७ हजार ८२७ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. तांत्रिक निविदा प्रक्रियेत अदानी इंटरप्राईजेस लि., जीआर इन्फ्रा प्रोजेक्ट्स लि. आणि प्रकाश एसफालटिंग अँड टोल हायवेज इंडिया लि. यांसारख्या देशातील आघाडीच्या पायाभूत सुविधा निर्माण करणाऱ्या कंपन्यांनी सहभाग नोंदवला आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या दर्जाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

**आमदार महेश लांडगे यांचा सकारात्मक पाठपुरावा...**

भाजपाचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी या प्रकल्पासाठी सातत्याने केंद्र व राज्य शासनाकडे पाठपुरावा केला होता. विशेषतः भोसरी ते मोशी इंद्रायणी नदी दरम्यानच्या भू-संपादनातील अडचणी, एफएसआय/टीडीआरच्या माध्यमातून जमीन उपलब्ध करून देण्यातील अडथळे, तसेच निधीबाबतचे प्रश्न त्यांनी वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणले.

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये...**

या प्रकल्पांतर्गत सिंगल पिलरवर उभारण्यात येणारा ८ पदरी एलिव्हेटेड फ्लायओव्हर, विद्यमान महामार्गाचे ४/६ पदरी रुंदीकरण, एकूण 30 किमी लांबी, तसेच स्वतंत्र सर्व्हिस रोडची उभारणी करण्यात येणार आहे. यामुळे स्थानिक वाहतूक आणि लांब पल्ल्याच्या वाहनांसाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण होणार आहे.

**उद्योजक व नागरिकांना मोठा दिलासा...**

हा कॉरिडॉर पूर्ण झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड, भोसरी आणि चाकणसारख्या प्रमुख औद्योगिक केंद्रांना खेडमार्गे वेगवान व सुरक्षित कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. सध्या पुणे–नाशिक महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी, अपघात आणि वेळेचा अपव्यय मोठ्या प्रमाणात कमी होणार असून, औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे.

# संदीप वाघेरेंची भूमिका म्हणजे "विचारांची तूट अन् भाषणाला उत"

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिका अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेत राष्ट्रवादीचे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी मोशी हॉस्पिटलच्या मुद्यावर सभागृहात प्रश्न उपस्थित केला. म्हणाले " मोशी हॉस्पिटल महापालिकेने बांधले... यात आमदारांनी काय केले... किती निधी राज्य शासनाकडून आणला..?" महापालिकेच्या माध्यमातून कामे होणार असतील, तर आमदार-खासदारांनी श्रेय कशाला घ्यायचे? असा त्यांचा खडा सवाल होता.**



### संदीप वाघेरेंची राजकीय बीजपेरणी...

राज्यातील एकूण राजकीय परिस्थिती पाहता २०२९ मध्ये राज्यात भाजपा- शिवसेना- राष्ट्रवादी हे तीनही पक्ष महायुती म्हणून लढणार नाहीत, यावर शिक्कामोर्बत झाले आहे. तत्पूर्वी, मतदार संघ पुन:बांधणी होणार आहे. पिंपरी, चिंचवड आणि भोसरी असे तीन विधानसभा मतदार संघ शहरात आहेत. त्याचे किमान पाच मतदार संघ होणार आहेत. विशेष म्हणजे, पिंपरी मतदार संघ जो अनुसूचित जातीसाठी राखीव आहे, तो मतदार संघ खुला होवू शकतो. संदीप वाघेरे याच मतदार संघातील प्रभागातून निवडून आलेले आहेत. त्यामुळे पिंपरी विधानसभा मतदार संघ खुला झाल्यास, त्यामध्ये विधानसभेची दावेदारी करता येईल. त्यासाठी आतापासून वाघेरे यांनी रणनिती आखली आहे. मग, निवडणुकीत संभाव्य प्रतिस्पर्धी असलेले आमदार, इच्छुक उमेदवार यांना त्यांनी "पॉलिटिकल डॅमेज" करण्यासाठी 'बेसलेस' आरोपांची आणि मुद्यांची उधळण करण्याची भूमिका घेतली असावी, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

त्यामुळे भाजपाचे चार, राष्ट्रवादीचे एक आणि शिवसेनेचे एक खासदार अशा नेत्यांना त्यांनी खुले आव्हान दिले. मात्र, हेच संदीप वाघेरे पवना नदीसुधार प्रकल्पाच्या मंजुरीचे श्रेय राजरोसपणे घेतात. तशा बातम्या प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्धीससुद्धा देतात. त्यामुळे, वाघेरेंची भूमिका म्हणजे "विचारांची तूट अन् भाषणाला उत" अशी आहे.

वास्तविक, पवना नदी सुधार प्रकल्पाच्या मंजुरीसाठी चिंचवडचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप, माजी आमदार अश्विनी जगताप आणि विद्यमान आमदार शंकर जगताप यांनी सातत्याने प्रयत्न केला आहे. राज्य विधिमंडळाच्या विविध अधिवेशनामध्ये त्यांनी हा मुद्दा उचलून धरला आहे. त्यामुळेच शहराच्या स्वच्छतेसाठी आणि पर्यावरण संतुलनासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या पवना नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाला राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA) कडून अधिकृत पर्यावरण मंजुरी (ENVIRONMENT CLEARANCE) आणि ना हरकत प्रमाणपत्र मिळाले आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे तब्बल 1 हजार 434 कोटींचा प्रकल्प आता प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या मार्गावर आला आहे.

आमदारांनी राज्याकडून किती निधी आणला शहरासाठी? असा सवाल करीत संदीप वाघेरे यांनी महापालिकेच्या कामांचे श्रेय आमदारांनी घेवू नये, असा मुद्दा उपस्थित केला. त्याचसोबत महापालिकेच्या कामांचे श्रेय नगरसेवकांना द्या... असा सल्लाही दिला. मात्र, हेच वाघेरे राज्य शासनाने मंजुर केलेल्या पवना नदी सुधार प्रकल्पाचे श्रेय घेताना आमदारांनी केलेल्या पाठपुराव्याला सोईस्कर विसरतात.

विशेष म्हणजे, पवना नदी पात्रात राडारोडा टाकणाऱ्यांवर कारवाई करा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही संदीप वाघेरे देतात. त्यामुळे नदी प्रकल्पाला राज्य शासनाकडून मंजुरी घेणारे वाघेरेंवर राज्यातील सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक असताना राडारोडा टाकणाऱ्यांविरोधात आंदोलन करण्याची वेळ का येते? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो.

वास्तविक, वाघेरे यांनी पवना नदी सुधार प्रकल्पासाठी पत्रव्यवहार केला असेल, यात शंका नाही. पण, त्या क्षेत्राचे विधानसभा सदस्य म्हणून आमदार शंकर जगताप यांनी हा विषय मंजूर करुन घेतला. त्याचे 'क्रेडिट' मात्र वाघेरे घेत आहेत, ही बाब व्यवहार्य नाही. किंबहुना, डेअरी फार्म येथील उड्डाणपुलाच्या कामासाठी संदीप वाघेरे यांच्या पक्षाचे नेते आणि विधानसभा उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांनी पाठपुरावा केला आहे. त्यांनी या प्रकल्पासाठी निधी मंजूर करण्याबाबत मागणी केली होती.

मग, या प्रकल्पाचे श्रेयसुद्धा वाघेरे घेताना दिसतात. याचा अर्थ असा होत नाही की, आमदारांनी या प्रकल्पांसाठी प्रयत्न केले नाहीत. किंबहुना, संदीप वाघेरे यांनी किती निधी राज्य शासनाकडून मंजूर घेतला हे पिंपरी-चिंचवडकरांसमोर मांडणे अपेक्षीत आहे.



## भूमिका

**'लॉ मेकर्स आर द ब्रिगेस्ट लॉ ब्रेकर्स' हे वाक्य आजच्या राजकारणात अक्षरशः खरे ठरताना दिसत आहे. संविधानाने दिलेल्या अधिकारांसोबतच लोकप्रतिनिधींवर एक सामाजिक आणि नैतिक जबाबदारीही असते. हा अलिखित कायदा अधिक महत्त्वाचा असतो, कारण तो थेट जनतेच्या विश्वासाशी जोडलेला असतो.**

# मंत्र्यांचे 'व्हिडीओ', काळी जादू... नेमकं काय चाललंय?



मात्र सध्या या नैतिकतेची उघडपणे पायमल्ली होताना दिसत आहे.

अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ यांचा कथित व्हिडीओ गेल्या काही दिवसांत चर्चेचा विषय ठरला आहे. या प्रकरणाची सत्यता तपासली जाणे गरजेचे असले तरी, समाजात निर्माण झालेला संशय आणि त्यातून उभे राहिलेले प्रश्न अधिक गंभीर आहेत. जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे वर्तन केवळ कायदेशीर कसोटीवर नव्हे, तर नैतिक कसोटीवरही टिकले पाहिजे. कारण कोर्टात केवळ खटले चालतात, पण समाजात प्रतिमा चालते.

अशा वेळी संबंधित मंत्री सार्वजनिकरीत्या समोर येऊन स्पष्टीकरण देण्याऐवजी दूर राहतात, हे अधिक संशय निर्माण करणारे ठरते. पूर्वीही त्यांच्या विभागातील भ्रष्टाचाराच्या घटना समोर आल्या होत्या. त्यामुळे आता या नव्या वादामुळे त्यांच्या प्रतिमेवर आणखी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'हे षडयंत्र आहे' हा बचावाचा नेहमीचा मार्ग असतो; पण जनता आज अधिक सजग आहे. सोशल मीडियाच्या युगात काहीही लपवणे कठीण झाले आहे.

या प्रकरणात सरकारची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर सरकारची प्रतिमा टिकवण्याची जबाबदारी आहे. आरोपांची निष्पक्ष चौकशी करून, सत्य समोर आले तर कठोर निर्णय घेणे हीच लोकशाहीची खरी परीक्षा ठरते. अन्यथा 'सत्ता वाचवण्यासाठी नैतिकतेचा बळी' अशी भावना अधिक बळावते.

दुसरीकडे, काही नेत्यांवर 'काळी जादू', करणी, वशीकरण यांसारख्या अघोरी प्रकारांचे आरोपही होत आहेत. विज्ञान आणि प्रगतीचा दावा करणाऱ्या महाराष्ट्रात अशा गोष्टींचा संबंध सत्ताधाऱ्यांशी जोडला जाणे ही खेदजनक बाब आहे. राजकारणात डावपेच असतात, हे मान्य; पण अंधश्रद्धेच्या आधारावर विरोधकांना संपवण्याचे प्रयत्न हे राज्याच्या पुरोगामी प्रतिमेला तडा देणारे आहेत.

या सर्व घडामोडींमुळे एक मोठा प्रश्न समोर येतो—राजकारणात नैतिकतेचे स्थान उरले आहे का? कायदेशीर बाबींची चौकशी आणि निकाल हा एक भाग आहेच; पण समाजाच्या न्यायालयात दिला जाणारा निकाल अधिक कठोर असतो. जनतेचा विश्वास गमावला, तर कोणतीही सत्ता टिकत नाही.

आज गरज आहे ती पारदर्शकतेची, जबाबदारीची आणि नैतिकतेची. आरोप खोटे असतील तर ते ठामपणे फेटाळले जावेत; आणि खरे असतील तर तात्काळ कारवाई व्हावी. अन्यथा 'कायदा बनवणारेच कायदा तोडतात' ही भावना अधिक दृढ होईल आणि लोकशाहीवरील विश्वास डळमळीत होईल.

## प्रासंगिक »

### शास्त्राचा उपयोग कोणता?

***प्राचीन भारतात नागार्जुन नावाचे एक महान रसायन शास्त्रज्ञ होऊन गेले. त्यांना एका सहाय्यकाची आवश्यकता होती.***

दोन तरुण या कामासाठी त्यांच्या मुलाख-तीला आले म्हणा ना – आचार्यांनी दोघात एक पदार्थ दिला व त्यापासून एक विशिष्ट रसायन करून आणायला सांगितलं. तीन दिवसाचा अवधी दिला. दोघे उत्साहाने कामाला लागले. तीन दिवसांनी परत आले. आचार्यांनी विचारले, 'कामात काही अडचणी तर आल्या नाहीत?' पहिला अभिमानाने म्हणाला, "आईला ताप होता वडील पोटदुखींना हैराण झाले होते. भाऊ पडल्यामुळे हाडाला मार लागला होता. पण माझी साधना मी सोडली नाही व हे रसायन करून आणल आहे." दुसरा म्हणाला, आचार्य, क्षमा असावी. मी घरी जात असता वाटेत एक वृद्ध रुग्ण दिसला. निर्धनही होता बिचारा. त्याला औषधोपचार करून त्याचे व्यवस्था ला-वण्यात वेळ गेला. आपण दिलेलं काम पूर्ण करू शकलो नाही. कृपया आणखी दोन दिवसाची सवड द्यावी.आचार्यांनी त्याचीच निवड केली.

- तात्पर्य : ज्ञान किंवा शास्त्र हे केवळ वैयक्तिक यशासाठी नसून समाजाच्या कल्याणासाठी वापरले गेले पाहिजे; मानवसेवा हाच खऱ्या शिक्षणाचा सर्वोच्च उद्देश आहे.

इंधन टंचाईमुळे देशात पुन्हा लॉकडाऊन लागू होणार असल्याच्या अफवा अलीकडे सोशल मीडियावर वेगाने पसरताना दिसल्या. कोविड-१९ काळातील अनुभव अजूनही ताजे असल्याने अशा बातम्यांमुळे नागरिकांमध्ये भीती निर्माण होणे स्वाभाविक आहे.

# अफवांच्या सावटात वास्तवाचा आवाज!




मात्र केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी या अफवा स्पष्टपणे फेटाळून लावत, लॉकडाऊनबाबत कोणताही प्रस्ताव नसल्याचे सांगितले आहे.

डिजिटल युगात माहितीचा प्रसार अत्यंत वेगाने होतो. सोशल मीडिया हे प्रभावी माध्यम असले तरी ते अफवांचे केंद्रही बनले आहे. अप्रमाणित माहिती काही क्षणांत लाखो लोकांपर्यंत पोहोचते. विशेषतः जागतिक अस्थिरतेच्या काळात, जसे की रशिया-युक्रेन संघर्षामुळे निर्माण झालेले ऊर्जा संकट, नागरिक अधिक संवेदनशील बनतात आणि अफवा अधिक वेगाने पसरतात.

सरकारच्या भूमिकेकडे पाहिल्यास, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. इंधन दरवाढीचा सोपा मार्ग असतानाही तो टाळून जनतेवरील आर्थिक ताण कमी ठेवण्याचा प्रयत्न दिसतो. ऊर्जा पुरवठा सुरळीत ठेवणे ही सरकारची प्राथमिक जबाबदारी असून, सध्यातरी पुरवठा स्थिर असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

मात्र या सगळ्यात सर्वात मोठा धोका आहे तो अफवांचा. लॉकडाऊनसारख्या संवेदनशील विषयावर चुकीची माहिती पसरल्यास लोकांमध्ये घबराट निर्माण होते. अनावश्यक साठेबाजी, बाजारातील गोंधळ आणि प्रशासनावर ताण वाढतो. कोविड काळात आपण हे अनुभवले आहे.

त्यामुळे नागरिकांनी अधिक सजग राहणे आवश्यक आहे. कोणतीही माहिती शेअर करण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे, अधिकृत स्रोतांवर विश्वास ठेवणे आणि अपप्रचार टाळणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. माध्यमांनीदेखील जबाबदारीने वागून सत्य माहितीच प्रसारित करावी.

शेवटी, अफवांपेक्षा वास्तवावर विश्वास ठेवणे आणि संयम राखणे हीच सध्याची गरज आहे. सरकार आणि नागरिक यांच्यातील विश्वास व सहकार्य टिकले, तर कोणतेही संकट सहजपणे पार करता येते.

## ।। अभंगवाणी ।।



समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।
तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥

आणीक न लगे मायिक पदार्थ ।
तेथें माझें आर्त नको देवा ॥धु॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# काँग्रेसच्या नेत्याने २२ वर्षांपूर्वी केलेलं वक्तव्य!

## नागपूरच्या आमदार निवासात गेल्या काही वर्षांमध्ये अनेक वादग्रस्त घटना घडल्या

**महाईन्यूज । नागपूर**

**राजधानी मुंबई आणि उपराजधानी नागपूरच्या आमदार निवासात गेल्या काही वर्षांमध्ये अनेक वादग्रस्त घटना घडल्या आहेत. सध्या गाजत असलेल्या मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याशी संबंधित प्रकरणामुळे २२ वर्षांपूर्वी साताऱ्यातील कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री दिवंगत विलासकाका उंडाळकरांनी विधिमंडळाच्या अधिवेशनात केलेल्या एका खळबळजनक वक्तव्याची आठवण ताजी झाली आहे.**





'आमदार निवास वेश्यांचा अड्डा बनलं आहे. आमदार निवासात गर्दुल्ले खुलेआम वावरत आहेत', असा बॉम्बच उंडाळकरांनी टाकला होता.

माजी मंत्री दिवंगत विलासकाका उंडाळकर हे २००३-०४ मध्ये सहकार आणि वस्त्रोद्योग मंत्री होते. तत्कालीन आघाडी सरकारच्या टर्ममधील अखेरचे अधिवेशन मुंबईत होते. त्या अधिवेशनात विलासकाका उंडाळकरांनी आमदार निवासातील गैरकृत्यांचा पाढाच वाचला होता. आमदार निवास वेश्यांचा अड्डा बनलं आहे. सगळीकडे गर्दुल्ले फिरत आहेत. सुरक्षेचा पत्ताच नाही. लोकप्रतिनिधी रात्री अपरात्री झुकांड्या देत येतात, असा खळबळजनक दावा उंडाळकरांनी केला होता. ज्यामुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. विलासकाकांनी २२ वर्षांपूर्वी जे सांगितले होते, ते खरे ठरले आहे.

मुंबईत पूर्वी आकाशवाणी हे एकमेव सरकारी आमदार निवास होते. १९९० च्या उत्तरार्धात नरिमन पॉईंट परिसरात मनोरा आमदार निवास बांधण्यात आले. विलासकाका उंडाळकरांनी केलेलं वक्तव्य हे आकाशवाणी आमदार निवासातील भानगडींच्या संदर्भात होते. कारण, ते १९८० पासून आमदार होते. त्यामुळे आकाशवाणी आमदार निवासातील खडानखडा माहिती त्यांना होती. विलासकाका पुस्तकप्रेमी होते. त्यांना वाचनाची आवड होती. त्यामुळे रात्री दोनपर्यंत ते वाचन करायचे. त्यांच्या रूमची लाईट सुरू असली की काका अजून जागे आहेत, हे सर्वजण ओळखायचे. त्यामुळे अनेक लोकप्रतिनिधी दबकत यायचे. तरीही विलासकाकांना त्यांच्या खास सूत्रांकडून सर्व माहिती मिळायची. कोण कधी आला, कोणत्या अवस्थेत होता, बरोबर कोण होतं, याची सर्व जंत्रीच त्यांच्याकडे असायची. त्याच माहितीच्या जोरावर विलासकाकांनी २००४ साली केलेल्या वक्तव्याने संपूर्ण विधिमंडळात भूकंप झाला होता.


### आमदार निवासातील काही ठळक घटनांच्या नोंदी

मुंबईतील आकाशवाणी, मनोरा आणि नागपूरच्या आमदार निवासात गेल्या काही वर्षात अनेक धक्कादायक घटना घडलेल्या आहेत. २०१२ मध्ये तत्कालीन आमदार बबन शिंदे यांच्या खोलीत तरूणीने आत्महत्या केली होती. २०१३ मध्ये आकाशवाणी आमदार निवासातील जयप्रकाश दांडेगावकरांच्या खोलीत एकाचा मृतदेह आढळून आलेला. सामूहिक बलात्कार पीडित तरूणीने २०१७ मध्ये नागपूरच्या आमदार निवासात आत्महत्येचा प्रयत्न केला होता. शिक्षकांच्या आंदोलनासाठी आल्यानंतर एका शिक्षकाने आकाशवाणी आमदार निवासाच्या चौथ्या मजल्यावरून उडी मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना २०२० मध्ये घडली होती. मद्यपी टोळक्याने अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना दारूसाठी ५०० रुपये मागितले होते. पैसे देण्यास नकार दिल्यानंतर दारूड्यांनी गोंधळ घातला होता. त्यानंतर भाजपच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी देखील आमदार निवासात रात्री बाटल्यांचा खच आढळून येत असल्याची तक्रार केली होती.

# १ जानेवारी २०११ पर्यंतची सरकारी जागेवरील अतिक्रमणे नियमित होणार

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यातील सरकारी जागेवरील २०११ पर्यंतची अनधिकृत निवासी बांधकामे नियमित करण्याचा मोठा निर्णय सरकारने घेतला आहे. यामुळे अनेकांच्या घरावरील कारवाईची टांगती तलवार हटली आहे. २०११ पर्यंत झालेली आणि सध्या केवळ घरांसाठी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी झाला आहे.**



या शासन निर्णयानुसार, कोणत्याही परिस्थितीत भारताचा नागरिक नसलेल्या व्यक्तीचे अतिक्रमण नियमित होणार नाही. याची दक्षता अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने घ्यायची आहे. असे अतिक्रमण आढळल्यास पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सरकारने घेतलेला हा निर्णय मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून संपूर्ण राज्यासाठी लागू आहे. यात ५०० चौरस फुटांपर्यंतचे निवासी अतिक्रमण पूर्णपणे विनामूल्य नियमानुकूल करण्यात येणार आहे तर उर्वरित क्षेत्रासाठी प्रचलित बाजारमूल्याच्या केवळ दहा टक्के रक्कम कब्जेहक्काची रक्कम म्हणून आकारली जाईल. नदीपात्र, नाले, गायरान, सार्वजनिक रस्ते, वने, स्मशानभूमी, खेळण्याचे मैदान किंवा शाळा/रुग्णालयासाठी आरक्षित असलेल्या जमिनींवरील अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत नियमित केली जाणार नाहीत. अशा बाधित कुटुंबांना 'प्रधानमंत्री आवास योजने'तून पर्यायी घरे उपलब्ध करून देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

तसेच अतिक्रमण नियमित करण्यासाठीची पात्रता, अटी व शर्ती, जागेची मर्यादा व शुल्क आकारणी, अंलबजावणीची कार्यपद्धती, अर्जासाठीची मुदत, पडताळणी, अंमलबजावणी यंत्रणा अशी सर्व यंत्रणा सज्ज करण्यात येणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने यासाठी अनेक बैठका घेतल्या गेल्या. 'सर्वांसाठी घरे' हे धोरण आणि 'विकसित महाराष्ट्र २०४७' चे उद्दिष्ट गाठण्यासाठी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवणे हा या निर्णयाचा मुख्य उद्देश असल्याचं सांगण्यात येते. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. यामुळे वेगवेगळ्या शासन मान्यतेची गरज पडणार नाही. या समित्याच निर्णय घेतील. जिल्हास्तरावर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १७ सदस्यांची समिती असून विधानसभा क्षेत्रनिहाय आमदारांच्या अध्यक्षतेखाली समित्या स्थापण्यात येणार आहेत.

राज्यातील एकही गरजू कुटुंब निवाऱ्याविना राहू नये. ही सरकारची भूमिका असल्याने एक जानेवारी २०११ पर्यंतची अतिक्रमणे नियमित करून आम्ही गरीब व गरजू कुटुंबांना दिलासा दिला आहे. यामुळे लाखो कुटुंबांच्या आयुष्यात स्थिरता येईल. दर तीन महिन्याने या संदर्भातील आढावा घेतला जाईल.

### पात्रतेसाठी काय आहेत अटी?

- जमीन पती -पत्नी यांच्या संयुक्त नावाने 'भोगवटादार वर्ग-२' म्हणून दिली जाईल.
- ग्रामीण तसेच शहरी भागात जास्तीत जास्त १५०० चौ. फुटापर्यंतचे क्षेत्र नियमित
- जास्त असलेले अतिक्रमण पाडण्यात येईल.
- ५०० चौ. फुटापर्यंतची सर्व निवासी अतिक्रमणे पूर्णपणे विनामूल्य नियमित
- घराचा काही भाग व्यवसायासाठी वापरत असल्यास बाजारमूल्याच्या २५% रक्कम
- जमिनीच्या नोंदणीसाठी १००० चौ. फुटापर्यंत १००० रुपये शुल्क
- १ जानेवारी २०११ पूर्वीच्या वास्तव्यासाठी मतदार यादी, वीज बिल, मालमत्ता पावती ग्राह्य
- गेल्या १ वर्षातील रहिवासाचा पुरावा बंधनकारक

# इंधन दराचा दर पंधरवड्याला आढावा

## ओमानकडून घेणार लोहखनिज; युद्धाच्या पार्श्वभूमीवर सरकारच्या 2 मोठ्या घोषणा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. या स्थितीचे बारकाईने निरीक्षण केले जाईल. त्यानुसार पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींचा दर पंधरवड्याला आढावा घेतला जाईल, असे केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळाचे (सीबीआयसी) अध्यक्ष विवेक चतुर्वेदी यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत सांगितले.**



### ओमानकडून घेणार लोहखनिज

लोहखनिज आणि कोक कोल यांसारख्या स्टील निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालासाठी भारत अर्जेंटिना, इंडोनेशिया आणि ओमानशी पुढील महिन्यात चर्चा करणार आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या ग्लोबल स्टील परिषदेत ही चर्चा होईल. चीननंतर भारत हा दुसऱ्या क्रमांकाचा कच्च्या पोलादाचा निर्माता आहे. इंडोनेशियामध्ये जगातील सर्वात मोठा निकेलचा साठा आहे. स्टेनलेस स्टीलच्या निर्मितीसाठी कच्चा माल म्हणून निकेलची आवश्यकता आहे. तर, ब्राझिल आणि ओमानमधून मोठ्या प्रमाणावर लोहखनिज आणण्याचा विचार आहे.

जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या तीव्र वाढीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात महत्त्वाची कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. पेट्रोलवरील सुधारित उत्पादन शुल्क २१.९० रुपये प्रति लिटरवरून ११.९० रुपये प्रति लिटरपर्यंत कमी करण्यात आले आहे. यामुळे सामान्य ग्राहकांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, या निर्णयाचा थेट परिणाम सरकारी महसुलावर होणार असून, पुढील दोन आठवड्यांत सुमारे १,५०० कोटी रुपयांचा महसूल घटण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींनी अलीकडच्या काळात मोठी उसळी घेतली आहे. एका टप्प्यावर या किमती १०० डॉलर प्रति बॅरलच्या वर गेल्या असून, ११९ डॉलर प्रति बॅरलपर्यंत झेपावल्या होत्या. अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावामुळे जागतिक तेल बाजारात अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. या भूराजकीय घडामोडींमुळे तेलपुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली असून, त्याचा थेट परिणाम किमतींवर दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पेट्रोलवरील विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्कात ३ रुपये प्रति लिटर कपात केली आहे, तर डिझेलवरील हे शुल्क पूर्णपणे रद्द करण्यात आले आहे. एकूण मिळून सुमारे १० रुपयांची करकपात करण्यात आल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. या निर्णयामागील मुख्य उद्दिष्ट म्हणजे तेल विपणन कंपन्यांवर वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतीमुळे येणारा आर्थिक ताण कमी करणे आणि ग्राहकांवर होणारा अतिरिक्त भार काही प्रमाणात हलका करणे.

दरम्यान, खासगी क्षेत्रातील नायरा एनर्जीने गुरुवारी पेट्रोलच्या किमतीत प्रतिलिटर ५ रुपयांची आणि डिझेलच्या किमतीत ३ रुपयांची वाढ जाहीर केली आहे. गेल्या काही आठवड्यांपासून कंपन्या वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतींचा भार स्वतः सहन करत होत्या. मात्र, परिस्थिती अधिकच बिकट होत गेल्याने त्यांनी अखेर दरवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ग्राहकांना मिळणारा दिलासा मर्यादित राहण्याची शक्यता आहे.

याच दरम्यान, सरकारने देशात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचा दावा केला आहे. सध्या देशात सुमारे ६० दिवस पुरेल इतका इंधनसाठा असल्याचे अधिकृतरीत्या सांगण्यात आले आहे. त्यामुळे इंधनटंचाईबाबत कोणतीही भीती बाळगण्याचे कारण नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. काही ठिकाणी अफवांमुळे नागरिकांनी घाबरून इंधनासाठी गर्दी केल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

# पुतीन यांनी उद्योजकांकडे मागितला पैसा, 'चेक' लिहायला घेण्यास सांगितले

**महाईन्यूज । रशिया**

**गेल्या चार वर्षांपासून युक्रेनशी सुरू असलेल्या युद्धामुळेरशियाच्या अर्थव्यवस्थेवर प्रचंड ताण आला आहे. एकीकडे मध्यपूर्वेतील युद्धामुळे जगात इंधन संकट निर्माण झाले असताना, दुसरीकडे रशियाची स्वतःची तिजोरी आता रिकामी होऊ लागली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रपती व्लादिमीर पुतिन यांनी रशियातील बड्या उद्योगपतींची तातडीची बैठक बोलावून त्यांना युद्धाच्या खर्चासाठी पैसे देण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत, असा दावा करण्यात येत आहे.**



### क्रेमलिनचे स्पष्टीकरण

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी देशातील बड्या उद्योगपतींची भेट घेऊन त्यांना युद्धाच्या खर्चासाठी 'चेक' लिहिण्याचे आदेश दिले, अशा चर्चांना क्रेमलिनने पूर्णविराम दिला आहे. रशियाच्या अधिकृत प्रवक्त्याने स्पष्ट केले की, अशा प्रकारची कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही. पुतिन आणि रशियन व्यावसायिक नेत्यांच्या भेटीचा उद्देश देशाची अर्थव्यवस्था मजबूत करणे आणि पाश्चात्य निर्बंधांना तोंड देणे हा होता, असे क्रेमलिनने म्हटले आहे. युद्धासाठी वैयक्तिक निधी मागितल्याच्या बातम्या केवळ अफवा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रशियन अधिकाऱ्यांच्या मते, रशियाची आर्थिक स्थिती कमकुवत आहे हे दाखवण्यासाठी पाश्चात्य माध्यमांकडून अशा प्रकारच्या 'खोट्या बातम्या' पसरवल्या जात आहेत.

याच पार्श्वभूमीवर राष्ट्रपती व्लादिमीर पुतिन यांनी देशातील प्रमुख उद्योगपतींची तातडीची बैठक बोलावल्याची माहिती समोर आली. काही वृत्तांनुसार, या बैठकीत पुतिन यांनी उद्योगपतींना युद्धासाठी आर्थिक योगदान देण्याचे आवाहन केले. युक्रेनमधील लष्करी मोहिमेसाठी सरकारच्या बजेटमधील मोठा हिस्सा खर्च होत असल्याने विकासकामांवर परिणाम होत असल्याची कबुलीही त्यांनी दिल्याचा दावा करण्यात आला. त्यामुळे उद्योगपतींनी त्यांच्या नफ्यातील काही भाग सरकारी तिजोरीत जमा करावा, असे सूचित करण्यात आल्याची चर्चा आहे.

दरम्यान, चार वर्षांपासून सुरू असलेल्या युद्धामुळे पाश्चात्य देशांनी रशियावर कडक आर्थिक निर्बंध लादले आहेत. या निर्बंधांमुळे व्यापार, गुंतवणूक आणि आर्थिक व्यवहारांवर मर्यादा आल्या आहेत. त्यातच युद्धाचा दररोज वाढणारा खर्च पाहता रशियाला अंतर्गत आर्थिक स्रोतांवर अधिक अवलंबून राहावे लागत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. जर ही परिस्थिती दीर्घकाळ टिकली, तर त्याचा परिणाम जागतिक शस्त्रास्त्र बाजारपेठ आणि इंधन पुरवठ्यावरही होऊ शकतो.

दरम्यान, रशिया इराण-अमेरिका तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणला पाठिंबा देत असल्याची चर्चा असली, तरी स्वतःची आर्थिक स्थिती कमकुवत होत असल्याने रशियासाठी ही भूमिका अधिक आव्हानात्मक ठरू शकते, असेही काही अहवालांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

मात्र, या सर्व दाव्यांवर रशियाच्या क्रेमलिन प्रशासनाने स्पष्टीकरण दिले आहे. उद्योगपतींना युद्धासाठी 'चेक' लिहिण्याचे आदेश दिल्याच्या बातम्या पूर्णपणे निराधार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पुतिन आणि उद्योगपतींच्या बैठकीचा उद्देश देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत करणे आणि पाश्चात्य निर्बंधांना प्रभावीपणे सामोरे जाणे हा होता, असे क्रेमलिनच्या प्रवक्त्याने सांगितले. तसेच, रशियाची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याचे दाखवण्यासाठी पाश्चात्य माध्यमांकडून चुकीची माहिती पसरवली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

एकूणच, युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियाची आर्थिक स्थिती आणि त्यासंबंधीच्या विविध दाव्यांमुळे जागतिक स्तरावर चर्चांना उधाण आले असून, यामध्ये नेमके सत्य काय हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# डेटिंगच्या अफवांवर मलायका भडकली!



बॉलिवूडमधील फिटनेस आयकॉन, अभिनेत्री, डान्सर आणि मॉडेल मलायका अरोरा ही नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असते. तिची स्टाइल, फिटनेस, सोशल मीडिया ॲक्टिव्हिटी आणि वैयक्तिक आयुष्य यामुळे ती सतत चर्चेचा विषय ठरते. सोशल मीडियावरही ती मोठ्या प्रमाणात सक्रिय असून तिचा चाहतावर्ग प्रचंड आहे. अलिकडेच एका कॉन्सर्टमध्ये ती 'मिस्ट्री बॉय'सोबत दिसल्याने सोशल मीडियावर चर्चा रंगल्या होत्या. त्यानंतर पुन्हा एकदा तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल चर्चा सुरू झाल्या. अरबाज खानसोबत झालेला घटस्फोट आणि त्यानंतर अर्जुन कपूरसोबतचे नाते संपल्यानंतर मलायका आयुष्यात पुढे जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसत आहे. दरम्यान, अभिनेता सौरभ बेदीसोबत तिचे काही फोटो व्हायरल झाले, ज्यात दोघे रोमँटिक पोज देताना दिसले. यामुळे दोघे एकमेकांना डेट करत असल्याच्या अफवा जोरात पसरल्या. या चर्चांवर प्रतिक्रिया देताना मलायकाने अतिशय शांत आणि सकारात्मक भूमिका घेतली. ती म्हणाली की, "हे सगळं आता जरा जास्तच होतंय, पण मी या गोष्टींकडे विनोद म्हणून पाहते. बऱ्याचदा मी आणि माझा मुलगा अरहान खान या सगळ्यावर हसतो. काही गोष्टी आपल्या हातात नसतात, जे व्हायचं ते होतंच." तिने पुढे सांगितले की, तिच्या आयुष्यात घडलेल्या घटनांनंतर तिचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे आणि ती सध्या आनंदात आहे. जोडीदाराबद्दल बोलताना तिने स्पष्ट केले की, "जर मला कोणासोबत राहायचं असेल, तर ते मी माझ्या अटींवरच ठरवेन." दुसरीकडे, सौरभ बेदीनेही या अफवा पूर्णपणे फेटाळून लावत स्पष्ट केले की, "आमच्यात फक्त चांगली मैत्री आहे. आमचं नाव एकत्र जोडलं जाणं निराशाजनक आहे." सध्या 52 वर्षीय मलायका अरोरा फिटनेस आणि लाइफस्टाइलसाठी ओळखली जाते. तिचे आणि अरबाज खानचे लग्न सुमारे 19 वर्षे टिकले, मात्र नंतर त्यांनी परस्पर संमतीने विभक्त होण्याचा निर्णय घेतला. आज मलायका आपल्या आयुष्याच्या नव्या टप्प्यात आत्मविश्वासाने आणि आनंदाने पुढे जात आहे.

# रणबीर कपूरच्या 'रामायण' बद्दल मोठे अपडेट



भारतीय चित्रपटसृष्टीतील 2026 मधील सर्वात बहुप्रतिक्षित आणि भव्य प्रकल्पांपैकी एक असलेल्या 'रामायण' चित्रपटाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. भगवान श्रीरामाच्या भूमिकेतील पुढील झलक 2 एप्रिल हनुमान जयंतीच्या शुभ मुहूर्तावर जागतिक स्तरावर प्रदर्शित केली जाणार असल्याची घोषणा चित्रपटाच्या निर्मात्यांनी केली आहे. या निमित्ताने जगभरातील चाहत्यांसोबत खास सेलिब्रेशनही आयोजित करण्यात येणार आहे. रामनवमी निमित्त नमित मल्होत्रा यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत या भव्य अनावरणाची माहिती दिली. त्यांनी लिहिले की, 'रामायण ही प्रत्येक भारतीयाची कथा आहे. हा चित्रपट पूर्ण श्रद्धा, जबाबदारी आणि समर्पणाने तयार केला जात असून त्याची भव्यता आणि भावना प्रामाणिकपणे प्रेक्षकांसमोर आणण्याचा प्रयत्न आहे.' तसेच हनुमान जयंतीच्या दिवशी 'राम'ची नवी झलक जगभरात एकाच वेळी दाखवली जाणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. चित्रपटाचा फर्स्ट लुक याआधी भारतासह जगातील अनेक शहरांमध्ये दाखवण्यात आला होता. विशेष म्हणजे न्यूयॉर्कमधील TIMES SQUARE येथेही 'रामायण'ची झलक प्रदर्शित करण्यात आली होती, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर चित्रपटाची मोठी चर्चा रंगली. दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या दिग्दर्शनाखाली हा चित्रपट अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि मोठ्या बजेटमध्ये तयार होत आहे. चित्रपट दोन भागांमध्ये प्रदर्शित होणार आहे. भाग 1: दिवाळी 2026 मध्ये येणार असून भाग 2: दिवाळी 2027 मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येईल.

# रुहानिकाचा लुक व्हायरल

टीव्ही मालिकेतून घराघरात पोहोचलेली ये है मोहब्बतें मधील 'रूही' म्हणजेच रुहानिका धवन आता मोठी झाली असून तिचा ग्लॅमरस अवतार सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे. अलीकडेच तिने साडीत केलेलं फोटोशूट शेअर केलं असून तिच्या नव्या लुकने चाहत्यांना अक्षरशः भुरळ घातली आहे. रुहानिकाने आपल्या या फोटोशूटला "नजाकत आणि विरासत" असं कॅप्शन दिलं आहे. तिचा हा लुक पारंपरिक भारतीय सौंदर्य आणि आधुनिक स्टाइल यांचं सुंदर मिश्रण दाखवतो. सध्या तिच्या या फोटोंवर सोशल मीडियावर लाईक्स आणि कमेंट्सचा पाऊस पडत आहे. या फोटोशूटमध्ये रुहानिकाने मरून आणि गोल्ड रंगाची साडी परिधान केली आहे. साडीवर असलेलं गोल्डन डिझाइन तिच्या लुकला रॉयल टच देतं. हलक्या आणि फ्लोई फॅब्रिकमुळे साडी अधिक एलिगंट दिसते. तिने साडी अगदी साध्या आणि नैसर्गिक पद्धतीने नेसली असून पल्लू खुला ठेवला आहे, ज्यामुळे तिच्या लुकमध्ये एक वेगळीच ग्रेस दिसून येते. या संपूर्ण लुकमध्ये सर्वात जास्त लक्ष वेधून घेतलं ते तिच्या बॅकलेस ब्लाउजने. टाय-अप स्टाइलमध्ये असलेला हा ब्लाउज मागून डोरीने बांधलेला आहे. या डिझाइनमुळे तिच्या लुकला बोल्ड आणि मॉडर्न टच मिळतो. त्याचवेळी बनारसी फॅब्रिकवरील गोल्डन जरी वर्कमुळे त्यात पारंपरिकतेची झलकही दिसते. ज्वेलरीनेही तिचा लुक अधिक उठून दिसतो. तिने मोठे झुमके, पर्ल चेन, लेयर्ड नेकलेस, बाजूबंद आणि गोल्डन कंगन घातले आहेत. मात्र, ज्वेलरी असूनही तिचा लुक ओव्हर न वाटता संतुलित आणि आकर्षक दिसतो. मेकअपमध्ये तिने सॉफ्ट ब्राउन-गोल्ड आयशॅडो, शार्प आय मेकअप आणि न्यूड पीची लिप्सचा वापर केला आहे. केस मागे बांधून तिने तिच्या ॲक्सेसरीज आणि ब्लाउजला खास हायलाइट केलं आहे. रुहानिकाचा हा लुक फॅशनप्रेमींसाठी एक उत्तम प्रेरणा ठरत आहे. साधी साडी आणि योग्य स्टायलिंग केल्यास कसा रॉयल आणि स्टायलिश लुक मिळू शकतो, हे तिने दाखवून दिलं आहे. मरून आणि गोल्डसारख्या क्लासिक रंगांचा वापर, सोबत डिझायनर ब्लाउज आणि योग्य ज्वेलरी यामुळे हा लुक अधिक खास बनतो.



# मुंबई इंडियन्स प्ले ऑफमध्ये जाणारच!

## ड्यू प्लेसिस ते इरफान पठाण, १२ एक्सपर्टची भविष्यवाणी

**महाईन्यूज । मुंबई**

**इंडियन प्रीमिअर लीगचे १९ वे पर्व सुरू व्हायला आता २४ तास शिल्लक राहिले आहेत. बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात सलामीची लढत होणार आहे. आयपीएल २०२६ पूर्वी झालेल्या ऑक्शनमध्ये सर्वच संघांनी तगडे खेळाडू आपल्या ताफ्यात घेतले आहेत आणि त्यामुळेच यंदाच्या आयपीएलमध्ये कडवी टक्कर पाहायला मिळेल, यात शंका नाही.**



आतापासूनच प्ले ऑफमध्ये कोणते संघ दाखल होतील, याची चर्चा सुरू झाली आहे. १२ एक्सपर्ट्सनी त्यांचे चार संघ निवडले आहेत आणि त्यात सर्वांमध्ये कॉमन नाव मुंबई इंडियन्स हे आहे...

RCB ने मागील पर्वात १७ वर्षांचा जेतेपदाचा दुष्काळ संपवला आणि आता ते जेतेपद राखण्यासाठी सज्ज झाले आहेत. पण, मुंबई इंडियन्स, चेन्नई सुपर किंग्स आणि कोलकाता नाइट रायडर्स हे माजी विजेते त्यांच्या मार्गातील मोठा अडथळा ठरू शकतील. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली पंजाब किंग्सची कामगिरी उल्लेखनीय झाली आहे आणि त्यामुळे यंदाच्या जेतेपदाच्या शर्यतीत त्यांचेही नाव आहेच. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्सने मागील पर्वात प्ले ऑफ पर्यंत मजल मारली होती आणि यंदा ते एक पाऊल पुढे जाण्यास सज्ज आहेत.

स्टार स्पोर्ट्सने १२ एक्सपर्टकडून अव्वल चारमध्ये म्हणजेच आयपीएल प्ले ऑफमध्ये कोणते संघ जातील, हे जाणून घेतले आहे. यामध्ये फॅफ ड्यू प्लेसिस, इरफान पठाण, हरभजन सिंग, आकाश चोप्रा, चेतेश्वर पुजारा, मोहम्मद कैफ, हनुमा विहारी, पीयुष चावला, सबा करिम, संजय बांगल, लक्ष्मीपती बालाजी आणि वरुण आरोन यांचा समावेश आहे. दक्षिण आफ्रिका आणि चेन्नई सुपर किंग्सचा माजी फलंदाज फॅफ ड्यू प्लेसिसने मुंबई इंडियन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, पंजाब किंग्स आणि चेन्नई किंवा दिल्ली कॅपिटल्स या चार संघांना पसंती दिली आहे.

### IPL 2026 साठी प्लेऑफमध्ये टॉप 4 संघांची तज्ज्ञांकडून निवड

- फॅफ ड्यू प्लेसिस - MI, RCB, PBKS व CSK/DC
- इरफान पठान - MI, DC, PBKS व RR.
- हरभजन सिंग - MI, SRH, PBKS.
- आकाश चोप्रा - MI, DC, RCB व PBKS.
- चेतेश्वर पुजारा - GT, CSK, KKR व MI.
- मोहम्मद कैफ - PBKS, DC, MI व RCB.
- हनुमा विहारी - SRH, DC, PBKS व MI
- पीयुष चावला - MI, KKR, RCB व PBKS
- साबा करीम - RCB, MI, DC व CSK
- संजय बांगर - MI, RCB, PBKS व DC
- लक्ष्मीपथी बालाजी - CSK, MI, RCB व SRH.
- वरुण आरोन - SRH, MI, RCB व CSK

# विराटच्या हातावर कमळाचा नवीन टॅटू; किंग कोहलीचा टॅटू चर्चेत

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इंडियन प्रीमियर लीगच्या २०२६ च्या हंगामापूर्वी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा स्टार फलंदाज विराट कोहली पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मात्र, यावेळी चर्चेचे कारण त्याची फलंदाजी नसून त्याच्या डाव्या हातावर कोरलेला एक नवीन आणि अतिशय आकर्षक 'टॅटू' आहे. विराटने आपल्या हातावर कमळ आणि पिओनी या फुलांची नक्षी असलेला 'फुल-स्लीव्ह' टॅटू काढला आहे.**




मॉडर्न क्रिकेट जगतातील किंग विराट कोहली IPL स्पर्धेसाठी सज्ज झाला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये फक्त वनडेत सक्रीय असणाऱ्या कोहली पुन्हा एकदा टी-२० मध्ये फटकेबाजी करताना पाहायला मिळणार आहे. या स्पर्धेआधी कोहली नव्या टॅटूमुळे चर्चेत आला आहे. ALIENS TATTOO INDIA च्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून कोहलीच्या डाव्या हातावरील टॅटू काढतानाचा खास क्षण शेअर करण्यात आला असून हा व्हिडिओ तुफान व्हायरल होताना दिसतोय.

विराटच्या हातावर आधीच काही टॅटू होते, ज्यात भगवान शंकरापासून प्रेरित असलेल्या एका 'आर्मबँड'चा समावेश होता. हे टॅटू फिकट झाले होते. नवीन डिझाइन करताना जुन्या विखुरलेल्या टॅटूंना एकत्र करून, त्यांना एक नवा आणि सुसंगत आकार देण्याचे काम कलाकारांनी केले आहे. हा नवा टॅटू फक्त शरीरावर आणखी एक डिझाइन काढून स्टाईल स्टेटमेंटमध्ये नवी भर घालण्यापुरता मर्यादीत नाही. तर त्यामागे खास अर्थ दडला आहे. टॅटू स्टुडिओच्या मते, हा टॅटू कोहलीच्या आयुष्याच्या प्रवासाचं प्रतीक आहे. त्याच्या व्यक्तिमत्वाचं प्रतिबिंब त्यात अधोरेखित होते.

### 'कमळ' आणि संयमाचे प्रतीक

कोहलीच्या कोपरापासून सुरू होणाऱ्या या टॅटूमध्ये 'मंडाला' आर्ट आणि 'डॉटवर्क'चा वापर करण्यात आला आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाचे प्रतीक म्हणजे 'कमळ'. चिखलात उमलूनही चिखलापासून अलिप्त राहणारे आणि पवित्रतेचे प्रतीक असलेले कमळ विराटच्या संयमी वृत्तीचे दर्शन घडवते. जीवनातील चढ-उतार आणि संघर्षातही स्वतःची शांतता आणि शिस्त कायम राखणाऱ्या विराटच्या स्वभावाशी हे प्रतीक साधर्म्य राखते, असे टॅटू आर्टिस्टने सांगितले.

### स्टाईल स्टेटमेंटचाही बादशहा

विराट मैदानावरील दमदार कामगिरीइतकाच मैदानाबाहेरील स्टाईल स्टेटमेंटसाठीही ओळखला जातो. क्रिकेटच्या मैदानात उतरण्यापूर्वी तो सरावाप्रमाणेच आपल्या लूकवरही मेहनत घेताना अनेकदा दिसला आहे. विविध हेअरस्टाईलमुळे लक्ष वेधून घेतल्यानंतर आता त्याचा नवा टॅटू चर्चेचा विषय ठरताना दिसत आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। शनिवार ।

दि. 28 मार्च 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


# नगरसेविका सुलभा उबाळे आग्रह करीत असलेल्या ठेकेदाराकडून ९५ लाखांचा अपहार!

## क्रीडा व युवक सेवा उपसंचालकांच्या चौकशीत धक्कादायक बाब समोर

## मॉंसाहेब मिनाताई ठाकरे जलतरण तलावाची निविदा वादाच्या भोवऱ्यात

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने काळ्या यादीत टाकलेला आणि ९५ लाख रुपयांचा अपहार आणि गैरव्यवहार केल्याचा ठपका असलेल्या ठेकेदाराला काम मिळावे. या करिता पिंपरी-चिंचवडमधील शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेविका सुलभा उबाळे महापालिका स्थायी समितीवर दबाव निर्माण करीत आहेत का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**



महाराष्ट्र शासन

उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग, पुणे

सर्वे नं.१९१, विभागीय क्रीडा संकुल, महाराष्ट्र हौसींग बोर्ड, येरवडा, पुणे-४११००६

ई-मेल: deputypune@gmail.com

क्र. उपसं/आस्थाप/जलतरणनिविदा/२०२५/का-१/९९८

दि. २४.०६.२०२५

प्रति,
मा.आयुक्त,
महानगरपालिका,
सोलापूर

विषय: ए.के.ग्रुप ग्रिफीन्स,वडगाव ,शेरी पुणे या संस्थेसंदर्भात चौकशी व निविदा बाबत सूचना

संदर्भ - आपला दिनांक २०.०६.२०२५ रोजीचा ई-मेल

महोदय,

सादर करण्यात येते की,ए.के.ग्रुप ग्रिफीन्स,वडगाव ,शेरी पुणे या संस्थेने सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जलतरण तलाव चालवण्याची ई- निविदा प्रक्रीयेत असून त्यांचे बाबत काळ्या यादीत आहे किंवा कसे याबाबत संदर्भीय मेल या कार्यालय प्राप्त आहे.

याअनुशंगाने ए.के.ग्रुप ग्रिफीन्स,वडगाव ,शेरी पुणे या संस्थेने विभागीय क्रीडा संकुल,येरवडा पुणे यांचेकडील जलतरण तलाव दिनांक ०१.०१.२०१९ ते ३१.१२.२०२३ या कालावधीकरीता कंत्राटीपध्दतीने टेंडर मिळविले आहे.

तथापि सदर संस्थेविरोधात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली. सदर चौकशीत रुपये ९५ लाखांचा आर्थिक अपहार व गैरव्यवहार झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे.सदर प्रकरणी शासन स्तरावर सध्या विभागीय चौकशी सुरु आहे.उपरोक्त माहितीचा स्विकार व्हावा हि विनंती.

आपला विश्वासू

(युवराज नाईक)
विभागीय उपसंचालक
तथा सचिव
विभागीय क्रीडा संकुल समिती पुणे

यमुनानगर, निगडी येथील कै. मॉंसाहेब मिनाताई ठाकरे जलतरण तलावाचे काम देण्यावरुन शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेविका सुलभा उबाळे यांनी मर्जीतील ठेकेदाराला काम मिळावे, यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका स्थायी समितीमध्ये राडा केला होता. प्रभाग क्रमांक १३ मध्ये हा जलतरण तलाव आहे. गेल्या अनेक दिवसांपासून बंद आहे. याच प्रभागातील भाजपा नगरसेविका आणि स्थायी समिती सदस्या अर्चना कारंडे यांचे पती आणि उबाळे यांच्यात बाचाबाची झाली होती. यावर उबाळे यांनी नगरसेविका स्थायी समितीची सदस्य असताना त्यांच्या पतीने बैठकीला उपस्थित राहण्याचे कारण काय? असा प्रश्न उपस्थित केला होता. याबाबत प्रसारमाध्यमांमध्ये बातम्याही प्रसिद्ध झाल्या आहेत.

दरम्यान, या प्रकरणातील ए. के. ग्रुप ग्रिफीन्स या ठेकेदारवर सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने काळ्या यादीत (ब्लॅक लिस्ट) टाकण्याची कारवाई केली. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी क्रीडा व युवक सेवा उपसंचालक कार्यालयाने केली. या चौकशीमध्ये संबंधित ठेकेदाराने ९५ लाख रुपयांचा अपहार आणि गैरव्यवहार केल्याचे प्रथमदर्शनी समोर आले आहे. सदरप्रकरणी शासन स्तरावर चौकशी सुरू आहे, असे सोलापूर महानगरपालिका प्रशासनाला कळवले आहे.



## काय आहे प्रकरण?

सोलापूर महानगरपालिकेच्या जलतरण तलावाच्या निविदा प्रक्रियेदरम्यान एक महत्त्वाची बाब समोर आली आहे. पुण्यातील वडगाव शेरी येथील 'ए.के. ग्रुप ग्रिफीन्स' या संस्थेविरोधात आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारी असून, सध्या त्याबाबत शासन स्तरावर चौकशी सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग यांच्या कार्यालयाकडून सोलापूर महानगरपालिकेला पाठविण्यात आलेल्या पत्रानुसार, संबंधित संस्था विभागीय क्रीडा संकुल, येरवडा येथील जलतरण तलाव १ जानेवारी २०१९ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत कंत्राटी पद्धतीने चालवत होती. या कालावधीत संस्थेविरोधात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार प्राथमिक चौकशीत सुमारे ९५ लाख रुपयांचा आर्थिक अपहार आणि गैरव्यवहार झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे. या प्रकरणी शासन स्तरावर विभागीय चौकशी सुरू असून अंतिम निष्कर्ष अद्याप प्रलंबित आहे. दरम्यान, सोलापूर महानगरपालिकेने संबंधित संस्थेच्या निविदा प्रक्रियेतील सहभागाबाबत सावधगिरी बाळगावी, अशी सूचना या पत्रातून केली आहे. या ठेकेदार कंपनीला काम नको, अशी मागणी स्थानिक नगरसेविका अर्चना कारंडे यांनी केली आहे.



"महापालिका स्थायी समितीला त्याच ठेकेदाराला काम जबरदस्तीने द्यायचे असेल, तर आमची हरकत नाही. पण, आम्ही आमच्या प्रभागात चुकीचे काम होवू देणार नाही. सोलापूरमध्ये एका युवकाचा बुडून मृत्यू झाला. यमुनानगरमध्ये तशी अनुचित घटना घडल्यास त्याला प्रशासन आणि संबंधित पदाधिकारी जबाबदार राहतील, असे लेखी द्यावे. स्थानिक नागरिकांची मागणी आहे की, जलतरण तलाव सुरू करावा. शहरात अन्य ठिकाणी काम करणारे अनेक ठेकेदार आहेत. त्यांना तात्पुरत्या स्वरुपात हे काम देता येईल. पण, एखाद्या सदस्याची मर्जी सांभाळण्यासाठी त्याच ठेकेदाराला काम देण्याचा आग्रह केला जात असेल, तर आम्ही त्याला विरोधच करणार आहोत.

**– अर्चना कारंडे,**
**स्थानिक नगरसेविका, भाजपा.**

# भोसरीत श्रीराम नवमी निमित्त दिमाखदार बाईक रॅली

## नगरसेविका कविता भोंगाळे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिस्तबद्ध आयोजन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**श्रीराम नवमीच्या पावन आणि मंगलमय निमित्ताने भोसरी परिसरात सलग पाचव्या वर्षी भव्य, दिमाखदार आणि उत्साहपूर्ण बाईक रॅली मोठ्या जल्लोषात पार पडली. मा. आमदार महेश दादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेविका कविता भोंगाळे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली या रॅलीचे उत्कृष्ट नियोजन व यशस्वी आयोजन करण्यात आले.**





रॅलीची सुरुवात राम मंदिर, चक्रपाणी वसाहत रोड, भोसरी येथून करण्यात आली.यावेळी शेकडो रामभक्त युवकांनी भगवे झेंडे हातात घेत "जय श्रीराम"च्या गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून सोडला. संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि उत्साहपूर्ण झाले होते.

रॅलीमध्ये सहभागी युवकांनी शिस्तबद्ध व सुरक्षित पद्धतीने मार्गक्रमण करत सामाजिक जबाबदारीचे भान राखले. त्यांच्या या अनुशासित सहभागामुळे समाजासमोर एक आदर्श निर्माण झाला. या उपक्रमामुळे भोसरी परिसरात सकारात्मक ऊर्जा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.

या प्रसंगी मंडलाध्यक्ष रविंद्रजी नांदुरकर, महिला मोर्चा सरचिटणीस रोहिणीताई मांढरे, महिला मंडलाध्यक्ष योगिताताई जाधव, प्रभाग अध्यक्ष स्वातीताई शिर्के, सरचिटणीस मनीषाताई गंगणे, उषाताई घुगे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

उपस्थित मान्यवरांनी श्रीरामांच्या आदर्शांचे समाजात पालन करण्याचे आवाहन केले. तसेच युवकांच्या उत्साहाचे आणि शिस्तबद्ध सहभागाचे मनापासून कौतुक करण्यात आले. या भव्य रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व आयोजक, स्वयंसेवक आणि सहभागी युवकांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

> श्रीरामांच्या आदर्शांवर चालत समाजात एकता, शिस्त आणि सकारात्मकता निर्माण करण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न आहे. भोसरीतील युवकांचा उत्साह आणि जबाबदारीची जाणीव पाहून समाधान वाटते. अशा उपक्रमांद्वारे सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करण्यासाठी आम्ही नेहमीच कटिबद्ध राहू.
>
> – **कविता भोंगाळे-पाटील**, नगरसेविका, भाजपा.

# शिकण्यासाठी वेळ घालवला, तर देशाचा विकास : प्रशांत जोगळेकर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**उद्योग संस्था आणि शिक्षण संस्था यांनी एकत्रित येऊन विद्यार्थ्यांना संशोधन, उद्योजकता आणि कौशल्य आधारित करिअरच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे असे प्रतिपादन मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे (एमसीसीआयए) संचालक प्रशांत जोगळेकर यांनी केले.**



पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) येथे "सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस"(एसआयसी) प्रमाणपत्र वितरण समारंभात जोगळेकर यांनी नवोपक्रम आणि कौशल्य विकासाचे महत्व या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी आपला वेळ नियोजन पूर्वक पद्धतीने शिकण्यासाठी घालवला तर तुमचा, तुमच्या कुटुंबियांचा आणि देशाचा विकास होईल असेही जोगळेकर यांनी सांगितले.

यावेळी सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसचे प्रोजेक्ट मॅनेजर डॉ. शशांक द्विवेदी, युएसडीसी टेक्नॉलॉजीचे संचालक हुसेन हाजीते, बाळासाहेब झरेकर, विजय कुलकर्णी, पीसीइटी कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयू कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप डी. थेपडे, डॉ. अभिजित बनुबकोडे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. पीसीयूचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले की, येथील शिक्षण हे कौशल्य व प्रत्यक्ष अनुभव यावर आधारित आहे. प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे म्हणाले की,"एसआयसी" राष्ट्र निर्मिती मध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. हुसेन हाजीते यांनी सांगितले की, आता सॅमसंग प्रमाणित अभ्यासक्रम आणि परिणाम आधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. तसेच पुण्यातील निवडक संस्थांमध्ये पीसीयूचा समावेश असल्याचा अभिमान वाटतो. आभार डॉ. अभिजित बनुबकोडे यांनी मानले.

कुलपती तथा पीसीइटीचे विश्वस्त हर्षवर्धन पाटील, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते तसेच प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### व्यवसायासाठी आत्मविश्वास वृद्धिंगत होण्यास मदत

डॉ. शशांक द्विवेदी यांनी सांगितले की,"सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पस"(एसआयसी) चा ४२ देशांमध्ये मध्ये उद्योग,व्यवसाय विस्तारलेला आहे. जागतिक स्तरावर एसआयसी विद्यार्थ्यांना एआय चे महत्व आणि सातत्याने कौशल्य वृद्धी चे महत्त्व समजून देण्यासाठी काम करत आहे. पीसीइटी कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, युएसडीसी टेक्नॉलॉजी संचालक,एसआयसी प्रतिनिधी यांच्याशी समन्वय साधून पीसीयू मध्ये शिक्षण संस्था आणि उद्योग संस्था यांच्यातील सहकार्य प्रकल्प विकसित करण्यात आले आहेत. यामुळे पीसीइटी सह पीसीयूच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योग, व्यवसायातील अनुभव मिळणार आहे. यामुळे गुणवत्ता वाढ होऊन त्यांच्या मध्ये नेतृत्व गुण आणि उद्योग, व्यवसायासाठी आत्मविश्वास वृद्धिंगत होण्यास मदत होईल.

# राज्यस्तरीय "डिपेक्स २०२६" स्पर्धेत पीसीपीचा द्वितीय क्रमांक

## शिक्षण विश्व : विविध महाविद्यालयांतील १२०० विद्यार्थी व एकूण ३२३ संघ

**महाईन्यूज** । पिंपरी- चिंचवड

**अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि सृजन, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, (एमआयटी) छत्रपती संभाजी नगर मधील कॅम्पस मध्ये आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय "डिपेक्स २०२६" प्रदर्शन स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) पिंपरी चिंचवड तंत्रनिकेतन (पीसीपी) मधील विद्यार्थ्यांनी "लेन गार्ड ए आय बेस्ड ऑटोमेटेड बीआरटी लेन व्हायोलेशन सिस्टीम" या विषयावर अभिनव आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम असा प्रकल्प सादर करून यश संपादन करत द्वितीय क्रमांक पटकावला आहे.**




तंत्रशिक्षण विभागाचे संचालक (डीटीइ) डॉ. विनोद मोहीतकर यांच्या हस्ते त्यांना रोख बक्षीस व पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत राज्यभरातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांतील १२०० विद्यार्थी व एकूण ३२३ संघ सहभागी झाले होते. कम्प्युटेशनल इंटेलिजन्स विभागातून उत्कृष्ट ३० ग्रुप निवडण्यात आले होते, त्यामध्ये पीसीपी च्या संघाचा समावेश होता.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीपीच्या प्राचार्या डॉ. विद्या बॅकोड यांनी विजेत्या संघाचे आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

### बीआरटी मार्ग बसेससाठी आधुनिक प्रकल्प..

पीसीपीच्या संघात स्वयंम ढवळे, अभिषेक देशमुख, तनया पाटील, श्रावणी गायकवाड, आयुषी ढेपे या विद्यार्थ्यांचा समावेश होता. पीसीपी च्या विद्यार्थ्यांनी "लेन गार्ड ए आय बेस्ड ऑटोमेटेड बीआरटी लेन व्हायोलेशन सिस्टीम" या विषयावर अभिनव आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम असा प्रकल्प सादर केला. त्यात पुणे, मुंबई सारख्या शहरात बीआरटी मार्ग बसेस साठी निर्माण करण्यात आला आहे. परंतु साधारण वाहने देखील यातून प्रवास करतात व वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून वाहतुकीत अडथळा निर्माण करतात. याला आळा घालण्यासाठी या विद्यार्थ्यांनी एआय प्रणाली वापरून हा प्रकल्प सादर केला. विद्यार्थ्यांना पीसीपीच्या प्राचार्या डॉ. विद्या बॅकोड, प्रा. मंगला मालकर, प्रा. मृणाल भालेराव यांचे मार्गदर्शन लाभले.

# पीसीसीओइआर संघाचा राष्ट्रीय गणित प्रश्नमंजुषा स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**महाईन्यूज** । पिंपरी- चिंचवड

**गणित हे आपल्या सगळ्यांच्या आर्थिक स्थितीशी जोडले गेलेले आहे. या गणितामुळे वास्तव जीवनातील समस्या सोडवण्यात यश मिळते. डेटा ॲनालिटिक्स व निर्णय प्रक्रियेमध्ये देखील याचा वापर केला जातो. विद्यार्थ्यांनी गणित केवळ अभ्यासापुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष जीवनात वापरले पाहिजे, असे प्रतिपादन सांख्यिकी तज्ज्ञ व ॲनालिटिक्स डॉ. दिनेश हेलवाडे यांनी केले.**







पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) वतीने रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च (पीसीसीओइआर) मध्ये मॅथेक्स क्लब तर्फे राष्ट्रीय स्तरावरील गणित प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले होते. किंग्सफॉल्क या संस्थेचे प्रायोजकत्व मिळाले होते.

यावेळी प्रख्यात सांख्यिकी तज्ज्ञ व ॲनालिटिक्स डॉ. दिनेश हेलवाडे, किंग्सफॉल्क संस्था प्रतिनिधी रोहन तळेगावकर, वीणा तळेगावकर, पीसीसीओइआरचे संचालक व प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, विभाग प्रमुख डॉ. शीतल पाटील, प्रा. मनीषा देशपांडे, सह प्राध्यापक सचिन वरपे आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत देशभरातील विविध महाविद्यालयांमधून २५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सहभागी विद्यार्थ्यांनी आपल्या विश्लेषणात्मक व समस्या सोडवण्याच्या कौशल्यांचे उत्कृष्ट सादरीकरण केले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन केले. प्रा. मनीषा देशपांडे यांनी आभार मानले.

### स्वत:साठी संधी निर्माण करा...

किंग्सफॉल्क संस्था प्रतिनिधी रोहन तळेगावकर यांनी विद्यार्थ्यांना उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग करून स्वतःसाठी संधी निर्माण करा असे सांगितले. पीसीसीओइआर चे संचालक व प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी विद्यार्थ्यांनी निश्चित ध्येय ठेवून ध्येयप्राप्ती साठी निरंतर प्रयत्न केले तर यश नक्की मिळते असे सांगितले. विभागप्रमुख प्रा. शितल पाटील यांनी देखील गणिताच्या माध्यमातून वास्तविक जीवनातील समस्यांचे निराकरण करण्याचे महत्त्व पटवून दिले. या राष्ट्रीय गणित प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम क्रमांक व्ही. आय. टी. कोंढवा येथील संघाने पटकावला. द्वितीय क्रमांक पीसीसीओइआर रावेत संघाने मिळवला तर तृतीय क्रमांक डी. वाय. पाटील पिंपरी येथील संघाने मिळवला.


DR. SUSHANT PATIL
GROUP
seamedu
Industry Aligned | Future Defined
Build Your Creative Career with a
University Degree in
Media & Design
ADMISSIONS OPEN
2026-2027
+91 9225088657
www.seamedu.com